**<u>ठळक बातम्या</u>**

- भाऊबीजेच्या सणाचा सर्वत्र उत्साह/ विविध उपक्रमांमधून दिवाळी साजरी
- भारत निर्मित 'आकाश' क्षेपणास्त्राच्या खरेदीत ६ ते ७ देशांना रस
- बिहारमधे मुख्यमंत्रीपदासाठी तेजस्वी यादव महाआघाडीचे उमेदवार
- महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत, आज भारत विरुद्ध न्यूझीलंड सामना नवी मुंबईत रंगणार

**आणि**

- ॲडलेड एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताचं ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २६५ धावांचं आव्हान

**<><><><><>**

देशभरात आज भाऊ बहिणीचं नातं दृढ करणारा भाऊबीजेचा सण उत्साहाने साजरा केला जात आहे. दिवाळीच्या पाचव्या दिवशी येणारा हा सण भाईदूज, यम द्वितीया, भाई टीका या नावानंही ओळखला जातो. आजच्या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या दीर्घायुष्याची कामना करत भावाचं औक्षण करतात. तर ओवाळणी म्हणून भाऊ बहिणींना त्यांचं संरक्षण करण्याचं वचन देतात.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व देशवासियांना भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भावाबहिणीच्या अतूट नात्याचं प्रतीक असलेला हा सण प्रत्येकाच्या जीवनात आनंद आणि समृद्धी घेऊन येतो, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. बहीणभावाचं हे नातं आणखी दृढ होत राहो, अशी कामना त्यांनी केली आहे.

दरम्यान, भाऊबीजेनिमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेत बेस्ट प्रशासन आज मुंबई आणि परिसरात १३४ अतिरिक्त बसेस चालवत आहे. या बस मुंबई उपनगरांबरोबरच ठाणे, मीरा रोड आणि भायंदर इथून चालवल्या जाणार आहेत, असं बेस्टच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही भाऊबीजेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

दिवाळीचा आनंद लुटताना विविध वंचित आणि दुर्लक्षित घटकांना सामावून घेतलं जात आहे. ठिकठिकाणी देवदर्शनाकरता मंदिरांमधे गर्दी आहे. अनेक धार्मिक आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. ऐकूया याविषयी अधिक माहिती.

**- - व्हिसी - -**

*(राज्याचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीनं वाशिम इथं काल “दीपोत्सव २०२५” हा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. छत्रपती संभाजीनगर इथले कुणाल वराळे, मुंबईचे मयुर सुकाळे आणि गायिका पौर्णिमा कांबळे यांनी या कार्यक्रमात विविध गीतांनी मैफिल सजवली. तसंच* ***वाशिम*** *इथले कलाकार शाहिर संतोष खडसे यांच्या नृत्य समूहानं आपली कला सादर केली. या कार्यक्रमात भक्तीगीत, भावगीत, चित्रपट संगीत अशा गीतांचं सादरीकरण करण्यात आलं. रत्नागिरीच्या जिल्हा मध्यवर्ती कारागृहात लायन्स क्लब तर्फे दिवाळी पहाट कार्यक्रम झाला. त्यात अनेक कैद्यांनी कलागुणांचं दर्शन घडवलं.*

***परभणीमध्ये*** *पालम तालुक्यातल्या चाटोरीमध्ये भारतीय सैन्यात कार्यरत असलेल्या सैनिकांच्या  कुटुंबियांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. सैनिक कृतज्ञता कार्यक्रम मागील पाच वर्षांपासून विविध गावात जाऊन आयोजित केला जातो. यावेळी सैनिक आणि कुटुंबीयांचा मानपत्र, शाल, श्रीफळ तसंच  पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.*

***अमरावतीत*** *स्थानिक तरुणांनी बहाळी परिसरातल्या स्मशानभूमीची स्वच्छता करुन दिव्यांची रोषणाई केली.)*

**<><><><><>**

भाऊबीजेच्या दिवशी प्रथेनुसार उत्तराखंडमधल्या यमुनोत्री आणि केदारनाथ धामची कवाडं आज विधिवत बंद करण्यात आली. या मोसमात १७ लाख ६८ हजार ७९५ यात्रेकरूनी केदारनाथाचं दर्शन घेतलं.

<><><><><>

भारत निर्मित 'आकाश' क्षेपणास्त्र खरेदी करण्यासाठी ६ ते ७ देश प्रयत्नरत असून आर्मेनियासोबत 'आकाश', 'पिनाक' आणि १५५ mm तोफांसारख्या संरक्षण साहित्याचे करारही झाले असल्याची माहिती संरक्षण मंत्रालयाच्या सूत्रांनी दिली आहे. या करारानंतर ब्राझीलसह इजिप्त, व्हिएतनाम, फिलिपीन्स आणि युएई या देशांनी देखील आकाश क्षेपणास्त्राच्या खरेदीत रस दाखवला असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान आकाश क्षेपणास्त्राच्या प्रभावी कामगिरीमुळे पाकिस्तानवर विजय मिळवणं सुलभ झालं, आणि ते जगानं पाहिलं आहे. आखाती देश, आसियान भागातील राष्ट्रं आणि इतर बाजारपेठांमध्ये आकाशची मागणी वाढण्याची शक्यता आहे, असा अंदाजही संरक्षण मंत्रालयाच्या सूत्रांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आज नवी दिल्ली इथं होणाऱ्या द्वैवार्षिक नौदल कमांडर्स परिषदेला संबोधित करणार आहेत. आपल्या भाषणात संरक्षणमंत्री २०४७ पर्यंत व्यापक राष्ट्रीय हितसंबंध आणि विकसित भारताचं व्हिजन डॉक्युमेंट सादर करतील. काल सुरू झालेली तीन दिवसांची परिषद ऑपरेशन सिंदूरनंतर नौदलाची भविष्यातली युद्धसज्जता आणि तयारीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

<><><><><>

बिहारमध्ये विधासभा निवडणुकीसाठी विरोधी पक्षांच्या महाआघाडीनं राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी प्रसाद यादव यांना मुख्यमंत्री पदाचा उमेदवार म्हणून घोषित केलं आहे. पाटणा इथं आज महाआघाडीच्या सर्व सात घटक पक्षांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. त्यावेळी काँग्रेसचे नेते आणि निवडणूक निरीक्षक अशोक गेहलोत यांनी ही घोषणा केली. महाआघाडी सत्तेत आली तर विकासशील इन्सान पार्टीचे प्रमुख मुकेश सहानी उपमुख्यमंत्री असतील अशी घोषणाही त्यांनी केली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी 'मेरा बूथ, सब से मजबूत' उपक्रमांतर्गत आज संध्याकाळी दूरदृश्य प्रणालीमार्फत भाजपा आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. बिहार निवडणूकांमध्ये विजयाची खात्री करण्यासाठी भाजपा आणि

आघाडीचे कार्यकर्ते अभूतपूर्व उर्जा आणि समर्पणानं काम करत आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

आगामी आसियान शिखर परिषदेत आपण दूरस्थ पद्धतीनं सहभागी होणार असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कळवलं आहे. यासंदर्भात आपण मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांच्याशी संवाद साधला असून, आसियानच्या अध्यक्षपदासाठी त्यांचं अभिनंदन केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

मलेशियात क्वालालंपूर इथं येत्या २६ ते २८ ऑक्टोबरदरम्यान ही शिखर परिषद होणार आहे.

<><><><><>

देशाचे पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंती निमित्त नंदुरबार जिल्ह्यातल्या शहादा शहरातून सरदार सन्मान यात्रेला आज सुरवात झाली. कुकडेल इथल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन ही सरदार सन्मान यात्रा सुरु झाली. २८ ऑक्टोंबर पर्यत नंदुरबार जिल्ह्यातल्या १२० हुन अधिक गाव-खेड्यांमध्ये भ्रमंती करुन ही यात्रा एकता स्वाभिमान आणि राष्ट्रसेवेचा संदेश देणार आहे.

<><><><><>

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत, आज नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील क्रीडा अकादमीच्या मैदानावर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सामना सुरु आहे. या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

गुणतालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी ५ सामन्यांमधून ४ गुणांची कमाई केली आहे. त्यामुळे स्पर्धेच्या उपांत्यफेरीत प्रवेश करण्याच्यादृष्टीनं हा सामना दोन्ही संघासाठी महत्वाचा असणार आहे.

<><><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलियातल्या तीन एकदिवसीय क्रिकेट मालिकतेल्या, ॲडलेड इथं सुरू असलेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २६५ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या भारताची सुरुवात खराब झाली. सातव्या षटकातच कर्णधार आणि सलामीवर शुभमन गील ९ धावांवर, तर विराट कोहली शुन्यावर बाद झाला. त्यानंतर माजी कर्णधार रोहीत शर्मा आणि श्रेयस अय्यर यांनी तिसऱ्या गड्यासाठी ११८ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला.

रोहीत ७३ तर श्रेयस ६१ धावांवर बाद झाला. अक्षर पटेल यानंही ४४ धावांचं मोलाचं योगदान दिलं.

ऑस्ट्रेलियाच्या वतीनं ॲडम झाम्पा यानं ४, बार्टलेट यानं ३, तर मिशेल स्टार्क यानं २ गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियानं २१ व्या षटकात २ बाद १०७ धावा केल्या होत्या.

मालिकेतला पहिला सामना ऑस्ट्रेलियानं जिंकला आहे, तर तिसरा सामना येत्या २५ तारखेला सिडनी इथं होणार आहे.

**<><><><><>**

भारताचा ऑलिम्पिक पदक विजेता नेमबाज अभिनव बिंद्रा यांना पुढच्या वर्षी होणाऱ्या हिवाळी ऑलिम्पिक स्पर्धेचा मशालवाहक म्हणून निवडण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**